SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

Vol.-2 Issue - 03 सप्टेंबर २००९ September 2009



**Chairman's visit to Amalner Branch on 15-08-2009**

from L/R Shri O. P. Bhatt, P. D. Chavan, Gangurde. Moharir, Jande, Sandenshiv, D. B. Muley and S. V. Gholap

**Chairman's visit to house where he was staying in Amalner in 1972**

L/R Mrs. Surekha Gholap, Mrs. Jyoti Bhatt, Mr. O. P. Bhatt and Mr. S. V. Gholap



Matter on Page No. 5

Visit us at : www.sbipensionerspune.org E-mail : sbipenmumbai@yahoo.com

September 2009 SAMVAD



Shri V. M. Gokhale, President, and Shri B. G. Dandekar, Advisor to the Federation lighting the Traditional Lamp while inaugurating Annual General Meeting on 22nd July 2009 at Ahmednagar.



Shri. Chandrakant Gujrathi welcoming the office bearers of the Association sitting on the dais (L to R)
Sarvashi R. N. Lalingkar - Secretary,
V. P. Bhave - Vice President,
P. M. Narkar - Vice President,
B. G. Dandekar - Advisor to the Federation
V. M. Gokhale - President,
S. G. Desai - Vice President,
S. B. Gokhale - Joint Secretary (Mumbai)
Bharat Gupte - Joint Secretary (Pune)
and S. P. Barve - Treasurer




Shri. Keshao Thaokar - AGM (PPG), Mumbai LHO speaking on the occasion of Bank's Pensioners' Meet held at Ahmednagar on 22nd July 2009.

# संपादकीय

मित्रांनो,

'वराह-ज्वरा' ने सध्या उभ्या महाराष्ट्राला आडवे केले आहे. मेक्सिको मधून आलेल्या ह्या 'वराह-ज्वरा'ने (Swine Flue) पुण्यामधून सुरूवात केली. महाराष्ट्रात कोणत्याही चांगल्या-वाईट गोष्टींची सुरुवात पुण्यातून होते असे म्हणतात. म्हणून पुण्याला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणतात का ?

तर शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात या साथीला प्रथम सुरुवात झाली, त्यामुळे शाळा-कॉलेजेस् बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. बाहेर गावचे विद्यार्थी गावाकडे निघून गेले. त्यांच्या सोबत हा विषाणू इतर शहरात पोहोचला. गणेशोत्सवाच्या उत्साहावर चांगलेच पाणी पडले. त्यामुळे यंदा गणेशोत्सवाला गर्दी नव्हती. मंडळांनी करमणुकीचे कार्यक्रम रद्द कले, सजावटी कमी केल्या. मंडळांनी सामाजिक जाणिवेचे भान ठेवले. गर्दी टाळणे हा (Swine Flue) वर एकमेव उपाय आहे. ह्या साथीच्या रोगावर वैयक्तिकरीत्या आपण काय काळजी घ्यायला पाहिजे, या संबंधी वर्तमानपत्रे व दूरदर्शन यांनी बहुमोल मार्गदर्शन केले आहे. पुण्यातील गणेश मंडळांनीही ह्या (Swine Flue) संबंधी मार्गदर्शक सूचनाफलक मंडपात लावले होते.

हा अंक आपल्या हातात पडेल तेव्हा नवरात्रोत्सवही संपलेला असेल व आपण दसऱ्याचे सोने लुटून दिवाळीची तयारी करीत असाल. थंडीमध्ये म्हणजे नोव्हें-डिसें. मध्ये 'वराह-ज्वर' वाढण्याची शक्यता व्यक्त होत असली तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. मात्र योग्य ती काळजी अवश्य घ्यावी.

निवडणूक आयोगाने नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे दि. १३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र विधान सभेची निवडणूक पार पडेल. त्यामुळे राजकीय नेत्यांमध्ये व त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये 'निवडणूक-ज्वर' हळूहळू वाढत जाईल. आता उमेदवारीचे तिकिट मिळविण्यासाठी ओढाताण सुरू होईल. नंतर युती करण्यासाठी बोलणी होतील, एकाची युती झाली की जागा-वाटपाचा घोळ सुरू होईल. तिकीट न मिळाल्यास बंडखोरी ठरलेली. मग आपल्याच पक्षाच्या उमेदवाराची पाडापाडी. पदयात्रा, होर्डींग्ज, सभा हे सर्व महानाट्य रंगणार आहे. खोट्या आश्वासनांचा पाऊस पडेल. आरोप-प्रत्यरोपांमुळे सर्वसामान्यांना उमेदवारांचे चारित्र्य, लायकी हे आपोआपच माहीत होईल.

आपण सर्वसामान्य माणसं अचंबित व हताश होऊन हे सर्व राजकीय रंगमंचावरील नाटक पहाणार आहोत.

मतदान हे सर्व नागरिकांचे प्रथम कर्तव्य आहे. मतदान हे पवित्र दान आहे आणि ते आपण केलेच पाहिजे, त्याबद्दल कुणाचेही दुमत असू नये. पण मतपत्रिकेवर असलेली नावे बघून त्यापैकी कोणत्या 'पापग्रहा'ला निवडून देण्याचे 'पाप' आपण करावे असा अत्यंत गहन प्रश्न आपणापुढे पडणार आहे. हा प्रश्न ज्याने त्याने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने सोडवावा असे आम्हास वाटते. सूज्ञास अधिक काय सांगावे ? या राजकीय समुद्रमंथनातून म्हणजे निवडणूकीतून कोण कोणती रत्ने बाहेर येतील ते लवकरच कळेल.

तरीही आपण अशी आशा करूया की येणारे नवीन सरकार महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेईल. निवडणुकीपूर्वी दिलेल्या सर्व आश्वासनांची नाही पण ग्रामीण व शहरी भागाची अत्यंत निकडीची गरज म्हणजे वीज व पिण्याचे पाणी. ह्या दोन गोष्टींची पूर्तता जरी पुढील येणाऱ्या काळात झाली. तरी सर्वसामान्य जनता अत्यंत आभारी राहील. बघू या काय होते ते ?

हा अंक हातात पडेल तेव्हा दसरा-दिवाळी उलटून गेलेली असेल. त्यासाठी आम्ही दसऱ्याबरोबर दिवाळीच्या देखील शुभेच्छा सर्व सभासदांना देत आहोत.

**- वसंत धुपकर**

## युनिट वार्ता

### ठाणे-मुलुंड पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ

ठाणे येथील 'ठाणे-मुलुंड पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळा' तर्फे दि.४ ऑगस्ट २००९ रोजी सौ.अनघा विद्वंस यांच्या सुगम गायनाचा कार्यक्रम झाला. त्यांनी गायलेल्या जुन्या गाण्यांवर रसिक श्रोते खूष झाले. श्री.विद्वंस व श्री.बर्वे यांनी तबला-पेटीची साथ उत्तम दिली. या गाण्याच्या कार्यक्रमानंतर महिलांसाठी हळदी-कुंकवाचा समारंभ झाला. सौ.विदुला ठुसे यांनी कार्यक्रमाचे नियोजन नेटकेपणाने केले होते.

- शरद गडकरी,
सचिव, सांस्कृतिक मंडळ,ठाणे.

## अभिनंदनीय !

आकोट (जिल्हा - अकोला) येथील आपले एक सभासद श्री.शरद पांडे यांचे चिरंजीव आनंद पांडे याने बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन) च्या परीक्षेत प्रथम श्रेणी मिळवून विशेष यश संपादन केले आहे. त्याबद्दल असोसिएशनतर्फे चि.आनंदचे हार्दिक अभिनंदन व पुढील उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा !

**- सेक्रेटरी**

## Appeal by our President to help Shri.Rajaram H.Jadhav, Dhule, who lost his house in recent riots at Dhule

Kindly refer the first list of Donors published in 'SAMVAD' for July 2009 who have given donations for the above purpose. The amount of Rs.5,301/- has already been sent to Shri.Jadhav by Demand Draft No.500151 dt.30-07-2009 on Dhule Branch. Since publication of this list in July '09 further donations have been received from following donors. The second instalment of donations of Rs.8,814/- has been credited to S.B.A/c of Shri.Jadhav on 28th August '09.

| | | |
|---|---|---|
| 1) | Shri.S.K.Pote | 100 |
| 2) | Smt.Sushila V. Alekar | 200 |
| 3) | Shri.Pramod Chate, Pune | 200 |
| 4) | Shri.Vasant V. Dhupkar, Pune | 251 |
| 5) | Shri.V.T.Darwhekar, Pune | 1000 |
| 6) | Shri.Shriniwas P. Barve, Pune | 100 |
| 7) | Shri.Shivaji Shankar Sawant,Dombivali | 100 |
| 8) | A Well Wisher, Pune | 501 |
| 9) | Shri.V.N.Kulkarni, Pune | 100 |
| 10) | Mrs.Shashi Swami, Pune | 100 |
| 11) | Shri.D.V.Patkar, Pune | 201 |
| 12) | Shri.Mohan A. Umbrajkar, Pandharpur | 200 |
| 13) | Shri.G.V.Mulay, Ahmednagar | 200 |
| 14) | Shri.N.Darandale, Ahmednagar | 200 |
| 15) | Shri.V.Gadkari, Nagpur | 100 |
| 16) | Shri.M.Bharde, Ahmednagar | 111 |
| 17) | Samson Samuel Mitra Mandal | 300 |
| 18) | Shri.D.Gore, Ahmednagar | 200 |
| 19) | Shri.A.M.Deshpande, Pandharpur | 100 |
| 20) | Mrs.Anandi Deshpande, Pandharpur | 100 |
| 21) | Shri.A.V.Mulay, Ahmednagar | 100 |
| 22) | Shri.V.Gawade, Ahmednagar | 100 |
| 23) | Shri.A.G.Kulkarni, Ahmednagar | 100 |
| 24) | Shri.R.B.Joshi, Ahmednagar | 100 |
| 25) | Shri.C.D.Dake, Ahmednagar | 100 |
| 26) | Shri.Sham Sharma, Ahmednagar | 200 |
| 27) | Shri.P.J.Lopes, Mumbai | 100 |
| 28) | Shri.J.Dias, Mumbai | 100 |
| 29) | Shri.B.K.Kulkarni, Ahmednagar | 100 |
| 30) | Shri.S.Chavan, Kurduwadi | 100 |
| 31) | Smt.Manisha Kulkarni, Nashik | 1000 |
| 32) | Shri.Viraj Markand, Nagpur | 100 |
| 33) | Shri.V.Nimaje, Nagpur | 100 |
| 34) | Smt.Pramila Dandavate, Vasai Road | 100 |
| 35) | Shri.S.N.Vaskar, Rahuri | 100 |
| 36) | Shri.V.Shukla, Nashik | 200 |
| 37) | Shri.C.Karale, Chas | 100 |
| 38) | Shri.S.M.Bardapurkar, Pune | 100 |
| 39) | Shri.S.V.Deshmukh, Ahmednagar | 100 |
| 40) | Shri.R.Kamalakar, Pune | 100 |
| 41) | Shri.S.S.Mahajan, Akola | 100 |
| 42) | Shri.M.B.Markad, Ahmednagar | 100 |
| 43) | Shri.A.V.Abhyankar, Ahmednagar | 200 |
| 44) | Shri.M.D.Palkar, Pune | 100 |
| 45) | Shri.V.G.Kotwal, Pune | 250 |
| 46) | Shri.D.S.Gokhale, Pune | 200 |
| 47) | Shri.Hari V. Pendse, Sangli | 500 |



# SBI CHAIRMAN'S VISIT TO AMALNER BRANCH
## First Branch in his career

On the 11th August 2009 a phone call was received by Shri.S.V.Gholap (one of our Pensioners from Thane) from our Amalner Branch, intimating scheduled visit of Bank's Chairman, Shri O.P. Bhatt, to that Branch on the 15th August 2009 and he was asked to be there on that day with other colleagues who were in the Branch at that time.

Subsequently a call from the Chairman's Secretariate was also received regarding the visit and the Chairman's desire to have a dialogue with the Staff working at Amalner Branch during 1972.

On the morning of the 15th August 2009, all Staff members were eagerly waiting for the Chairman's arrival at the Branch, and at about 11.30 A.M., Shri O.P. Bhatt, our Chairman, entered the Amalner Branch, with his wife, Mrs. Jyoti Bhatt. This was the Branch in which he joined the Bank for his first Branch training in July 1972 as Probationary Officer. After traditional welcome in the Branch, he was honoured by offering "FETA". Immediately thereafter he started making enquiries about his old colleagues and informal dialogue with them was initiated.

Sarvashri P.D.Chavan, Disa, Gholap, Moharir, Dhande, Muley, Gangurde, Sandenshiv, Brahme were some of the old colleagues with whom he interacted.

Shri Bhatt was then offered a chair on the dais and was requested to have few words to the staff. During informal speech he recollected his old sweet memories. He narated about how and in which emotional atmosphere he left his home town DEHARADUN for the first time in his life and came to Amalner by making enquires at various points, including our Delhi HO/Branch. He recollected the incidences on his first day in the branch, viz. communication and interaction with the Branch Manager and staff. His experiences while working with the staff particularly with Shri.Disa, a clerk attached to 'DD Purchase' Desk and Shri. P.D.Chavan, Branch Accountant, who gave him preliminary lessons of Banking. The Branch Manager was interacting with him and was having good communication/dialogues on cricket, rather than Banking. He also highlighted his familiar relations with staff, recollecting a favourable dish of 'POHA' offered to him on his visits to residences of staff members and how he had to compromise his food habits for Chapati & Omlet. Though Mr.Bhatt and all staff members were physically in the year 2009, psychologically all were enjoying the old memories of 1972.

Recently Amalner Branch has been shifted to new premises and old premises have been occupied by Central Bank of India. A short visit was arranged to the old premises where he recollected his old days.

During his stay in Amalner he was staying in SBI Staff "Suyog' Colony. The house was owned by Shri Gholap. At the instance of Shri Bhatt a visit was arranged for him and also for Mrs. Bhatt to the house of Shri Gholap. During this visit he was observing the area, which is now developed and surrounded by bunglows. He took lunch only with his old colleagues of 1972 and had informal talks on various subjects.

Shri Hemant Gokhale, Branch Manager, Amalner Br. offered him Memento. SBI Pensioners' Association's Amalner unit also offered him Memento and at 3.30 p.m. Shri Bhatt, left Amalner for Dhule - with old golden memories of Amalner Branch.

The visit of Shri.O.P.Bhatt, Chairman, was made a grand success by Shri Hemant Gokhale, Branch Manager, Amalner, and Shri Anand Karmarker and others.

All the present Staff Members and Pensioners of the Bank will cherish the memories of this historic visit of our beloved Chairman, viz. Shri O.P. Bhatt forever in their future life.

We congratulate, on behalf of SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Shri.O.P.Bhatt, Chairman, SBI for his approach towards his old colleagues and this shows some of the hidden facets of his tender loving behaviour with his old memories. – Madhav Shahane, Thane (W)

Phone : (022) 25425021

( Courtesy "Pensioners' Pulse", a Quarterly House Magazine of S.B.I.Pensioners' Association (Bhubaneswar Circle)

## A New Project 'HRMS' for Centralised Payment of Salary & Pension Processing

Please refer to Local Head Office Circular letter No.Cir.DO/HRMS/01 of 2009-10 dt. 01-05-2009 wherein detailed guidelines and instructions have been given for salary and pension payment of SBI Employees. For this purpose a Centralised Salary and Pension Processing Centre (CSPPC) has been ser up at GITC Belapur under HRMS (Human Resource Management Solution). We append below the guidelines for pension payment for your information.

Guidelines for Pension Processing :

A) Data Validation and Audit : Since Pension for all SBI/IBI pensioners and family pensioners is already being processed and paid by all Circles through RHMS, correctness of data must have been ensured by the Circles. However, in view of the proposed centralized processing, Circles will be required to conduct a data migration audit before April 2009.

B) Data ownership and obtention of Life Certificate : The data ownership of all pensioners and family pensioners drawing pension through the branches under a Circle shall remain with the respective Circle (Branches). Branches where the pension accounts are being maintained shall continue to obtain the Annual Life Certificate from the Pensioners. For recording of Life Certificate, a facility through HRMS portal or through some other application will be provided to the branches shortly.

C) Data updation/modification and reporting changes : It is observed that in most of the Pensioners/Family Pensioners cases, only minimum data is available in HRMS. Since through HRMS whole Bank repository of all employees / ex-employees is being created. branches are advised to procure maximum data for Pensioners / Family Pensioners at the earliest. Details such as current address including e-mail address, telephone numbers, bank details, PAN number and family details etc. are important as availability of such information will not only help the Bank in communicating directly with pensioners but will also expedite the pension processing and disbursement of arrears, if any, TDS deposit and fixation of family pension. The data modification on account of change of pension status (Pensioner to family pensioner or change of family pensioners), account details, stoppage and restart of pension on account of non-submission/ submission of Life Certificate etc. will continue to be handled by the PPG officials at the LHO.

D) New Pensioners : Till such time the pension approval process gets fully automated under HTMS, whereby an employee will be automatically converted into pensioner and his pension fixation will be done in HRMS system itself. Circle will use the existing RBPAS system only for the pension sanction process for new pensioners / family pensioners. On approval/sanction PPG officials at LHO will feed the pension / family pension and account details of such new pensioners/ family pensioners into HRMS system from the date of their becoming pensioner/family pensioners. No payment of pension or any arrear should be made from outside HRMS.

E) Timelines : HRM envisages pension processing and payment for all SBI/IBI pensioners/ family pensioners on a single day every month. it is therefore important to observe discipline in submitting changes by the following due dates.

1. Changes in Pensioners data to be advised to LHO by - 18th of every month.
2. Dry run of Pension for the current month at CSPPC - 22nd of every month.
3. Verification of Pension details by PPG officials at LHO by - 24th of every month.
4. Final Pension processing at CSPPC - 25th of every month.
5. Credit to Pensioners accounts and debit to CAO - 26/27th of every month.

6. Deposit of Statutory Deductions viz. Income Tax etc. - Last day of the month.

F) All credits to Bank accounts only : It is mandatory that pension is credited to a Bank account only. No Banker's Cheques will be issued except in the case of attachment orders etc. All pensioners/family pensioners, therefore, should maintain pension accounts with any branch of the Bank. Pension will be paid by debit to CAO Kolkata, for which an interim account will be opened by CAO Kolkata and funded for the pension payment on 25$^{th}$ of each month based on the pension processing report generated from HRMS.

G) SBILIFE Deductions : Since SBILife Group Insurance Scheme for SBI Staff is available till the member attains 65 years of age, many pensioners would be members who would like the premium to get deducted from monthly pension itself. While for the new pensioners such option may be obtained at the time of application for pension, for those who have already retired, SBILife shall arrange for one time option authorizing Bank to deduct the premium from the pension.

H) Payment of Arrears, if any : Since pension for all employees through HRMS is being processed from April 2008 pension arrears, if any, on account of revision etc. prior to April 2008 would be processed by the respective branches/Circles manually upto march 2008 and advised to HRMS cell for payment alongwith the next month pension. Circles which have gone live for pension prior to / after April 2008 shall be required ro calculate such arrears till the month of go-live or upto March 2008 depending upon their convenience. Branches are advised to desist from making payment of such arrears directly at their end in order to avoid Income Tax calculation relayed problems.

I) Reporting of Death of Pensioners : HRMS shall be providing the facility of recording date of death of any pensioner/family pensioner to the Branch Managers through the portal. However, till such time this facility gets developed, branches will report the death to the PPG Department at LHO, who will record the date of death in HRMS. Pension/Family Pension will automatically get stopped from the recorded date of death. However, in cases where the reporting is late and there is recovery of pension/family pension from the late pensioner's/family pensioner's account, branches will manually refund the amount to CAO Kolkata on receipt of advice from CSPPC or the PPG Department at LHO.

J) Income Tax and Submission of Investment Declaration : Income Tax on the pension paid to all pensioners will be handled through HRMS. PPG Department will obtain investment details latest by October each year from those pensioners who qualify for TDS and key in the data in HRMS. For submission of investment proof and its verification, separate instructions will be issued in due course. Income Tax projections report will be available for each pensioner with the PPG Department and also in individual's Pension Slip generated from HRMS each month. Form-16 will also be made available to all pensioners through HRMS portal and also in paper printed form duly signed or digitally signed by the Drawing and Disbursing Authority. Form-24 will also be made available to the branches through FTP site.

K) HRMS Portal to Pensioners : In order to make out ex-employees feel part of the institution which they proudly served till their superannuation or retirement, the facility to access HRMS portal will be extended to the retired employees as well in due course of time. Efforts are in hand to provide access to other in-house web-sites like State Bank Times, P & HR site through HRMS portal as well. Once the portal gets fully developed, such pensioners will not only be able to view their pension details but also will remain connected to the developments taking place in the Bank.

# Living In The Present For Peace

All religious teachings refer to importance of the present or the Now. In the Bhagvat Geeta it is said 'Karmnye Vaadhikaarasthe maa phaleshu kadaachana'. It means you have right to action but not to its fruits. You have to think of now or in the present for action without expecting anything in future. Dhyaan or meditation in which one watches breathing in and out is essentially remaining in the Now. It brings peace & bliss in the process.

The readings from the Gospels such as "Take no thought for the morrow" or "Nobody who puts his hands to the plow and looks back is fit for the Kingdom of God ", "are meant to be lived and bring about a profound inner transformation".

"The whole essence of Zen (Buddism practiced in Japan ) consists in walking along the razor's edge of Now". "In the Now, in the absence of time, all your problems dissolve, suffering needs time; it can not survive in the Now". "Question in the Zen tradition is this; 'if not now, when?".

"The Now is also central to the teachings of Sufism, the mystical branch of Islam....Rumi, the great poet and teacher of Sufism, declares; 'Past and future veil God from our sight; burn up both of them with fire".

Remaining in the present with no resistance to the experience in the Now helps you get rid of the pain. In most of the cases if we feel and experience the pain in the body without any resistance to it, the pain disappears. This has been my experience. "By watching the mechanics of the mind, you step out of its resistance patterns, and you can then allow the present moment to be. This will give you taste of the state of inner freedom from external conditions, the state of true inner peace. Then see what happens, and take action if necessary or possible". In other words, not resisting the present moment does not mean that you should not take action, if possible, to avoid such situations in future.

Pain we suffered in the past remains in our sub-conscious mind. The accumulated pain from the past gets lodged in your mind and body. This is a negative energy field both dormant and active. A thought or an innocent remark made by some one can activate it. The pain-body wants to survive and it can do so only if it gets you to consciously identify with it. If you live in the present, the Now, you disassociate yourself from the past. If you derive joy in the Now, pain can not feed on joy. There will be intense resistance of mind to dis-identifying from your pain.

The mind is a superb instrument if used rightly. When fully associated with the past and future (except for planning for future. Now), it uses you; this is a disease. But, when you are fully in the Now, you can use the mind for peace. If dwelling in the past is too much and fear of the future is predominant, the mind control becomes predominant and moments of being in the Now which are negligible can create a split personality. When in extreme situation it becomes suicidal. "The Buddha taught that even your happiness is dukkha (suffering)............it is inseparable from its opposite". Happiness and unhappiness are separated by illusion of time. Budhist monk once said to mean that" I have learnt to offer no resistance to what is; I have learned to allow the present moment to be and to accept impermanent all things and conditions. Thus I have found peace". The happiness found from outer sources is not deep or permanent But, happiness from within when you enter the state of non- resistance provides vibrant peace. If every thing around collapses in that state of mind, you will still feel inner core peace. "You may not be happy, but you will be at peace". Body the physical structure which is subject to old age, pain, disease and death is not real you. It is represented as such due to limitations of our mind which has lost touch with reality. This belief in separation from the Being justifies the state of fear of the mind. The truth is

within our body and it is called as soul, which lies underneath the body. Through soul you are inseparably connected to unmanifested One Life .Through Soul you are forever one with God.

"If you keep your attention in the body(soul) as much as possible, you would be anchored in the Now. You won't loose yourself in the external world, and you won't loose yourself in your mind. Thoughts and emotions, fears and desires, may still be there to some extent, but they won't take you over".

Awareness of Soul significantly lowers down the aging of the physical body. When you identify with the timeless Soul, the past and future no longer dominate your attention. "Your timeless essence will shine through the outer form, and you will not give the appearance of an old person". The more consciousness of Soul is brought to the outer body, immune system becomes stronger. "It is also a patent form of self-healing. Most illnesses creep in when you are not present in the body "(through Soul). "When you inhabit your body, it would be hard for unwanted guests to enter".

You can use your mind for specific purpose in conjunction with your Soul. Whenever you need an answer or solution focus your attention on the Now through Soul. i.e. inner energy. When you resume thinking it would be full of energy and peace. If you want to deal with the past or plan for future, it has to be at the level of the Now.

Note: The article is based on the book The Power of Now by Eckhart Tolle, a contemporary spiritual teacher. It has been written for the benefit of fellow pensioners.The Author has written about the inner body which I have stated as soul due to the nature of 'inner body' stated in the book.

– S V Naik, Mumbai 400 069. Cell: 09821127616

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स, इकॉनॉमी सहली

**राजगुरू टुर्स**

जिव्हाळा जपणारी माणसं

| टुर | पॅकेज | कंडक्टेड |
|---|---|---|
| केरळ-बॅकवॉटर्स | 7,875/- | 10,975/- |
| सिमला-मनाली-चंदीगड | 6,975/- | 11,975/- |
| नैनीताल-कौसानी-कार्बेट | 6,425/- | 10,975/- |
| हैद्राबाद-श्रीशैल्य-रामोजी | 4,475/- | 5,425/- |
| बंगलोर-म्हैसूर-ऊटी | 5,975/- | 9,475/- |
| कोकणदर्शन-आंबोलीसह | 4,475/- | 5,425/- |
| काश्मिर-वैष्णोदेवी Std. | 9,875/- | 14,975/- |
| राजस्थान-मारवाड | 8,275/- | 10,475/- |
| राजस्थान-मेवाड | 8,975/- | 12,275/- |
| मध्यप्रदेश स्पेशल | - | 16,475/- |
| इंदोर-उज्जेन-मांडु | - | 6,575/- |
| अंदमान (विमानासह) | - | 27,975/- |

सिंगापूर-बँकॉक • श्रीलंका • मॉरीशस

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना रू.५००/-प्रत्येकी सवलत

संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
मुंबई : 022 - 2431 8082 / 2438 1026
पुणे : 9822949289

## औरंगाबाद झोनल सब्-सेंटर

### वार्षिक सर्वसाधारण सभा : २००९-२०१०

औरंगाबाद झोनल सब्-सेंटर मधील, म्हणजे मराठवाडा व धुळे,नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यातील सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.३० ऑक्टोबर २००९ रोजी 'सुयोग मंगल कार्यालय',सिडको एम-५,प्लॉट नं.३,टाऊन सेंटर,औरंगाबाद येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ यावेळेत आयोजित केली. याच ठिकाणी त्याच दिवशी सायं.४ ते ५ या वेळात बँकेतर्फे 'पेन्शनर्स मीट' आयोजित केली आहे. तरी धुळे,नंदुरबार, जळगाव व मराठवाड्यातील सर्व सभासदांनी दोन्ही सभांना उपस्थित रहावे ही विनंती. ज्या कोणाला या सभांतून कांही प्रश्न मांडावयाचे असतील त्यांनी ते लेखी स्वरूपात श्री.जयंत धर्माधिकारी यांचे घरच्या पत्त्यावर २० ऑक्टोबर ०९ पूर्वी पाठवावेत ही विनंती. पत्ता : श्री.जयंत धर्माधिकारी, २१,'भगवंत', भगतसिंग नगर, मोरेश्वर सोसायटी, गारखेडा, औरंगाबाद-४३१००५; फोन-(०२४०)२४४३३३५; मो.-९४२२८७७७०८.

– जयंत धर्माधिकारी,सेक्रेटरी

# वनवासी किमयागार

ज्येष्ठ लेखक गो.नी.दांडेकर यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार २००८ साली धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बारीपाडा येथे कार्यरत असलेले **श्री.चैत्रराम देवचंद पवार** यांना मिळाला. ते महाराष्ट्राच्या वनवासी कल्याण आश्रमाचे उपाध्यक्ष (प्रांत) आहेत. आम्ही नगरचे कल्याण आश्रमाचे काही कार्यकर्ते त्यांचे संपूर्ण काम कसे चालते, त्यांना प्रेरणा कशी मिळाली वगैरे गोष्टी जाणून घेण्यासाठी ६ सप्टेंबरला बारीपाड्याला गेलो. त्यांनी केलेली सर्व कामे प्रत्यक्ष वाहिल्यावर थक्क व्हायला होते.

एम्.कॉम. शिकलेला आदिवासी भागातला तरुण स्वत:च्या कुटुंबापुरते नक्कीच मिळवू शकला असता. परंतु पिंपळनेर पासून २४ कि.मी. वर सह्याद्रीच्या रागांमध्ये केवळ ९६ उंबरठे असलेल्या गावात अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या बारीपाडा गावातील आदिवासींचा विकास करण्यासाठी व तेच ध्येय पुढे ठेवून शेजारी असलेल्या वारसा गावात वनवासी कल्याण आश्रमासाठी योगदान देणारे डॉ.आनंद फाटक, जे आता औरंगाबाद येथील हेडगेवार रुग्णालयात प्रमुख पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या संपर्कात आल्यावर १९९२ पासून श्री.पवार यांनी स्वत:ला ह्या कामात वाहून घेतले.

३४५ हेक्टर क्षेत्रात प्रथम वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेतला. सर्व ग्रामस्थांच्या मदतीमुळे व काही नियम स्वत:साठी स्वत:च करून जसे चराईबंदी कुऱ्हाडबंदी- असे ठरवून झाडांची वाढ जोमात व्हायला लागली. ग्रामस्थांची ग्रामसमिती स्थापन केली असून त्यांच्यामार्फत जंगलाची राखण केली जाते. वर्षभर पुरेल एवढे सरपण आणण्याची परवानगी वर्षातून एकाच महिन्यात दिली जाते. जंगलात प्रामुख्याने सागाची, लाखेची, मोहाची झाडे तसेच अन्य वनौषधी व रोज लागणारा भाजीपाल्याची लागवड केली जाते.

कृषी विद्यापीठाशी संपर्क साधून आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती करून घेतली आणि चतु:सुत्री पद्धतीने भातशेती करत आहेत. त्यामुळे भाताच्या उत्पादनात भरपूर वाढ झाली आहे. दरवर्षी २० टनाच्या आसपास तांदळाचे उत्पादन होते. ९० प्रकारच्या भाज्या लागवडीत आहे. आम्ही गेलो त्या दिवशी भाजीस्पर्धा होती. तेथेच उत्पादित केलेल्या भाज्यांच्या पाककृती होत्या. पाड्यावरच्या प्रत्येक घरातील स्त्री सहभागी झाली होती. स्पर्धेचे हे सहावे वर्ष असून भाग घेणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या महिलेने २६ प्रकारच्या भाज्या केल्या होत्या. विशेष म्हणजे भाजीचा आरोग्याच्या दृष्टीने शरीराला काय उपयोग होतो हे प्रत्येक महिलेला नीट माहिती असून ती त्याप्रमाणे सर्वांना सांगू शकत होती.

तांदळाचे उत्पादन झाल्यावर बाकीच्या दिवसात काम नसल्याने आदिवासी स्थलांतरित होत असत. त्या जंगलाजवळ त्यांना थांबवण्यासाठी श्रमदानाने सुमारे ३०० दगडी बांध तर काही माती बांध तयार केले. त्यामुळे पाण्याची पातळी वाढून १०० टक्के-जलसंधारण यशस्वी झाले. कोणतीही शासकीय मदत न घेता जिथे फक्त एकच विहीर होती तेथे ४०-४५ विहीरी बांधून वर्षभर पाणी पुरेसे झाले. त्यामुळे शेजारच्या ५ गावांना पण पाणी पुरवणे शक्य झाले.

मधुमक्षिका पालन केंद्र सुरू केले. गावात एकूण ३० पेट्या असून संपूर्ण परिसरात २५० पेट्या आहेत. एका पेटीत वर्षभरात साधारणपणे ३५ किलो मध गोळा होतो. मधाची विक्री ग्राम समितीमार्फत होते. शेतीमध्ये तांदळाशिवाय गहू, नागली, बटाटा व भाजीपाला तयार होतो. शेती सामूहिक नाही. परंतु उत्पादनाची विक्री व वितरणव्यवस्था ग्राम समिती करते. गावात एकही भूमीहीन नाही किंवा कोणाच्याही नावावर बँकेचे अथवा सोसायटीचे कर्ज नाही.

मोहाच्या फुलापासून मद्यनिर्मिती तर बियांपासून तेलनिर्मिती करतात व त्याच्या पेंडीपासूनच बायोगॅस प्रकल्प नातू फाऊंडेशनच्या सहकार्याने चालू केला आहे. त्यामुळे गावातील प्रत्येक घरात किमान एक दिवा व स्ट्रीट लाईट लागतो. गाव खऱ्या अर्थाने प्रकाशाने उजळून निघाले आहे. गावात साक्षरता आहे. पूर्वी जिल्हा परिषदेची शाळा होती, कधी वर्गशिक्षक तर कधी विद्यार्थी गैरहजर त्यामुळे १५ दिवस पण शाळा भरत नव्हती. ह्यावर उपाय म्हणून विद्यार्थी गैरहजर राहिला तर पालकाला दंड व शिक्षकाला पण. त्यामुळे आता १००% हजेरी व गावात ८ द्विपदवीधर तर ८ पदवीधर व १२ वी पर्यंत शिकलेले १६ आहेत. संतती नियमन १००% यशस्वी झाले आहे.

गावात महिलांचे बचत गट तीन आहेत. आरोग्यविषयक काम एक गट करते तर अन्य दोन नाचणीचे पापड तयार करतात. मागणी खूप आहे. गूळ प्रक्रिया केंद्रपण सुरू केले आहे. सेंद्रिय गूळ असल्याने मागणी खूप आहे.

कोणताही पुरस्कार मिळविण्यासाठी मी ग्राम विकासाचा ध्यास घेतला नाही तर गाव स्वावलंबी व्हावे, मुलांना चांगले शिक्षण मिळावे, ग्रामस्थांना विविध योजनांद्वारे रोजगार मिळावा, कष्ट करण्याची उमेद त्यांना मिळावी ह्या ध्येयाला ग्रामस्थांची साथ त्यामुळे आदर्श तंटामुक्त गाव निर्माण करण्यात चैत्ररामचे अथक प्रयत्न कारणीभूत आहेत. साध्या साध्या गोष्टीतून व सर्वांच्या प्रयत्नातून एक माणूस काय काय करू शकतो ह्याचे उत्तम उदाहरण आपल्याला लोकांना सांगता येते व आपणही असेच चांगले काम करण्याची प्रेरणा पण त्यातून नक्कीच मिळते, असा निर्धार करूनच आपण बारीपाड्यातून परतीच्या प्रवासाला लागतो.

**- सौ.विद्या पटवर्धन**
दूरध्वनी - ०२४१-२३२८९०१

## भाव तैसा देव एक अनुभव

आम्ही वर्धा व नागपूर येथील काही समर्थभक्त चार धामांपैकी एक जगन्नाथपुरी क्षेत्री दर्शनार्थ गेलो होतो. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे आम्ही कोणार्क, भुवनेश्वर, नंदनकानन इ. स्थळे पाहणार होतो. रेल्वेने जगन्नाथपुरीला पोचलो. दुसरेच दिवशी कोणार्कला जाताना जो समुद्रकिनारा लागतो तेथे सागर दर्शनार्थ थांबलो. सागराच्या लाटा पाहून थक्क झालो. बहुधा भरतीचे दिवस असावेत. आम्ही उभयता उभे असता एक फोटोग्राफर आला व म्हणाला, ''बहेनजीका फोटो निकालना है.'' आम्ही नाही म्हटले असतानाही त्याने फोटो काढण्यास बाध्य केले. त्याच्या सूचनेनुसार सौ.सागराकडे पाठ करून उभी झाली. तो क्लिक करणार इतक्यात एक प्रचंछ लाट आमच्या मागून आली. तो फोटोग्राफर जोराने ओरडला, ''बहेनजीऽ'' पण लाट आमच्या डोक्यावरून गेली. आम्ही लगेच खाली बसलो. पायातील पादत्राणे इतस्तत: गेली. लाटेने सर्वांग ओलेचिंब होऊन रेती डोक्यात व डोळ्यात गेली. पाय घट्ट रेतीत रोवले गेल्याने आम्ही लाटेबरोबर वाहत जाण्यापासून वाचलो. आम्ही गलितगात्र होऊन गेलो होतो. परंतु स्वत:ला सावरून पुढील प्रवासास सहप्रवाशांबरोबर धैर्याने निघालो. कोणार्कला पोहोचल्यावर एक माणूस सौ.चा फोटो घेऊन आला व पैसे घे म्हणत असतानाच निघूनही गेला. सौं.च्या पर्समध्ये श्रीसमर्थांचा फोटो, जपमाळ व काही पैसे होते. परंतु पर्समध्ये पाणी शिरले असतानाही त्या वस्तू मात्र कोरड्या होत्या. कोण होता तो माणूस ? देवावर अतूट श्रद्धा असल्याने संकटातून वाचलो. समर्थ रामदासांच्या ओव्या आठवल्या-

''भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भूलला ।
संकटी भावे भाविकाला । रक्षीतसे ।।
जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसे भजे त्याला । तैसाचि बोले ।।''

दुसरे दिवशी चिलका सरोवर पहायला गेलो. सरोवर कसले ? प्रतिसागरच. प्रचंड लाटांचा खळखळाट. आमच्यापैकी काहींनी बोटिंग करण्याचे ठरविले. आम्ही १५-१६ जण बोटीत बसलो. प्रचंड लाटा व वायुवेगाने बोट हेलकावे घेत होती. सरोवराच्या अगदी मध्ये पोचताच लाटांबरोबर प्रचंड वादळी हवा. त्यामुळे बोट अधिकच हेलकावे घेऊ लागली. आम्ही सर्व घाबरलो. बोटचालकास बोट किनारी घ्यायला सांगितले. वायुवेग इतका अनावर होता की आता बोट बुडणार असे वाटू लागले. तेव्हा प्रसंगावधान ठेऊन 'ही रामनाम नौका' हे रामगीत उच्चरवात म्हणण्यास आम्ही सुरूवात केली. 'रामा आता तूच तारक' असे गीतात भाव आहेत. त्यातल्या खालील ओव्यांचा आम्हाला प्रत्यक्ष अनुभव आला -

''भ्रम भोवऱ्यात अडली । नौका परी न बुडली ।
धरुनी सुकाणू हाती । बसलेत रामराया ।।
सुटले अफाट वारे । मन तारू त्यात बिथरे ।
त्या वादळातुनिया । नेईल रामराया ।।''

- हे गीत म्हणत व रामरायाचा जयजयकार करीत जीव मुठीत धरून आम्ही किनारी केव्हा पोचलो कळलेच नाही. म्हणून वाटते, ''देव आहे, संकटी पाळी भक्तासी''.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी 'मनाच्या श्लोकां'मधून सुद्धा हेच सांगितले आहे -

''असे हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।
अनन्यायी रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।''

**- अ.दा.रोटकर,** समर्थवाडी, वर्धा - ४४२००१
दूरध्वनी - ०७१५२-२५४१७५




- केरळ, कन्याकुमारी, कालिकत, वैनाड (मलबारा मॅजिक)
- उटी, कोडाई, म्हैसूर
- हैद्राबाद, श्री शैल्यम्, रामोजी फिल्मसिटी
- जयपूर, जैसलमेर, उदयपूर, माऊंट आबू
- दार्जिलिंग, सिक्किम
- सिमला, मनाली, डलहौसी, धरमशाला
- काश्मिर, नैनिताल

वैयक्तिक, ग्रुप तसेच हनिमुन स्पेशल सहलींचे आयोजन
कधीही निघा, स्वतंत्र प्रवासाची संपूर्ण व्यवस्था
गोवा आणि हिमाचल टुरिझमचे अधिकृत प्रतिनिधी

संपर्क
AMEYA Travels
१, चैत्रबन, स्वामी विवेकानंद रोड, मल्हार सिनेमाजवळ, ठाणे (पश्चिम)
दूरध्वनी : (०२२) २५४२ १७१४
भेटण्याची वेळ : संध्याकाळी ७ ते ९

Website - www.ameyaholidays.com
E-mail - ameyatravels@rediffmail.com

# पर्यावरण - सावधान

पर्यावरण तसा गोड शब्द. सर्व परिचित. पण आजच्या २० च्या शतकात तो ज्वलंत प्रश्न बनलाय ! ढासळणाऱ्या पर्यावरणाबाबत भारत, चीन, अमेरिका व युरोप आदि देशांना काळजी वाटत आहे. प्रदूषण वाढत आहे. सजीवांचे जीवनमरण, माणसाचे अस्तित्व, देश विकास या दृष्टिकोनातून या समस्येकडे पाहिले पाहिजे. याची जाण सर्व जगाला झाली आहे. पर्यावरणाविषयक जागतिक परिषद वेळोवेळी धोक्याचा इशारा देत आहेच.

पर्यावरण म्हणजे एकूणच सभोवतालची परिस्थिती. निसर्ग-त्याचे घटक. हिरवाई, निरभ्र-निळेकाळे आकाश, धरणीमाता, संथ वाहणाऱ्या नद्या, हासतखेळत वाहणारे निर्झर, झरे, ओढे.... झुळझुळ वाहणारा वारा... नित्य नियमाने बरसणारा मेघराजा..ऊन..सूर्य-चंद्र..साद घालणारे पक्षी..आणि वृक्ष..आपला परिसर..धूर...कचरा..जो आपला जवळचा मित्र..गुरू. पालनकर्ता ''निसर्गराजा''.. पर्यावरण म्हणजे पृथ्वी-जग.. इ.

निसर्ग आणि मानव यांचं अतूट नातं, ऋणानुबंध, अनंतकालापासून आहेत. तो मानवजातीच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी रात्रंदिन झटत आहे. पण आपण मात्र त्याला दूर दूर ठेवत आहोत. सारं जगच बदलत चाललंय ना ! म्हणून निसर्गही बदलत चाललाय ! अभूतपूर्व घटना घडत आहेतदैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. दुषित हवामान 'ग्लोबल वॉर्मिंग' सारखे शत्रू डोके वर काढत आहेत. 'जागतिक तपमान वाढ' सर्व देशाला मोठे संकट वाटत आहे.

'ग्लोबल वॉर्मिंग' मुळे सर्व जग भयभित झाले आहे. उष्णतेच्या लाटांमुळे भारतात सर्वत्रच लोक हैराण झालेले दिसतात. जागतिक तपमान वाढीमुळे खार फुटीची जंगलेच नष्ट होण्याचा धोका. तर कधी समुद्र पृष्ठभागाचे तापमान वाढ -समुद्र पातळीत वाढ - कधी कोठे महापुराचा धोका निर्माण झालाय.

या सर्वांचा एकच परिणाम म्हणजे हवेत वातावरणात प्रदूषण, दुषितेचे प्रमाण भयानक वाढते आहे. सृष्टीचा समतोल बिघडत चालला आहे. वाऱ्यामुळे वातावरणात धूळ वाढते - रोगजंतू पसरतात - रोग वाढतात. पण हे सारेच नैसर्गिक आहे काय ?

प्रदूषण मानवनिर्मित आहे. जल प्रदूषण 'नदीला माता, देवता मानणं ही आपली धर्म संस्कृती आहे. पण याच नद्यांना आपण मलीन करतो आहोत. कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, निर्माल्य टाकणे, सांडपाणी. रासायनिक घाण पाणी, मळी, कारखान्यांचे सांडपाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नद्या गटारगंगा झाल्यात. ध्वनीप्रदूषण, गोंगाट, समारंभात स्टिरिओ स्पिकर यांचा वापर. भोंगे यंत्रांचा खडखडाट, हॉर्न, वाहनांचा सततचा आवाज यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले यांचे आरोग्य धोक्यात येते.

हवेचे प्रदूषण - गुलालाचा वापर, दारू-फटाक्यांच्या माळा, या स्फोटकांमुळे अशुद्ध वायू पसरतो. वाढती कारखानदारी त्यामुळे निघणारा धूर आजच्या तंत्रज्ञान-इंटरनेटच्या जगात वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड, मोनाक्साईड सारखे वायू पसरतात ते सजिवांचे शत्रू ठरतात. शेतीसाठी रसायनाचा अतिवापर घातक आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणाचा, शहरीकरणाच्या उद्योगामुळे समुद्र-नद्या हटवून बिल्डिंग उभारणे, गगनाला भिडणारे प्लॅट उभारले जात आहेत, वृक्षतोड या कृत्यांमुळे माणूस वनसंपदेचा ऱ्हास ओढवून घेत आहे.

खेड्यात काय किंवा शहरात काय - कचरा समस्या आहेच. दूषितीकरण - प्रदूषण मानवनिर्मित अथवा नैसर्गिक असो - ते मानवासाठी रोगांना आमंत्रण ठरत आहे. जनावर, पशुपक्षी यांचे रोग माणसांना होतात. डेंगी, चिकनगुनिया, यलो फिव्हर-मलेरिया यामुळे मनुष्य प्राणी बळाचा ऱ्हास होत आहे. जंतू प्रबळ होत आहे. तर माणसाची रोगप्रतिकार शक्ती कमी झाली आहे. पर्यावरणाचे निरागस रूप नष्ट पावतंय. जगात दरवर्षी ७०००० लोक मृत्यू पावतात. कारण एकच प्रदूषण.

हवामानाबद्दल आंतरराष्ट्रीय परिषदेने वेळोवेळी अहवाल सादर केले आहेत. भारत कृषिप्रधान देश आहे. त्यात निसर्गाची साथ लाभली आहे. आपल्याला निसर्गाचं संतुलन साधलंच पाहिजे. शास्त्रीय ज्ञान वापरून नैसर्गिक साधन संपत्ती जपणे योग्य ठरणार आहे.

''सेंटर फॉर क्लायमेट चेंज रिसर्च'' सारख्या संस्था कार्यरत आहेतच. कार्बन क्रेडिट कार्बन उत्सर्जन कमी करून मर्यादा ठरविण्याबाबत पर्यावरण पूरक पावले म्हणजे क्योटोकरार. २००५ ला जवळजवळ १६६ देशांनी सहकार्य केले आहे. पर्यावरण बदलावर लक्ष ठेवण्यासाठी सरकारी पातळीवर 'प्लक्सनेट' इंडोप्लक्स योजना बारकाईने अभ्यास करत आहेत.

पर्यावरण आपल्याला हाक देत आहे; पर्यावरण संतुलन - समतोल आजच्या युगाची गरज आहे. सावधान.. नाहीतर हे प्रदूषण जगातील मानवजात उध्वस्त करेल.

पर्यावरणाबाबत ही माझी जबाबदारी नाही हे माझे काम नव्हे म्हणणे चुकीचे ठरेल. आपल्यात, आजच्या तरूणाईत पर्यावरणात बदल करण्याची ताकद-क्षमता जरूर आहे. मानवी विकास भौतिक सुखाच्या नादात विकासाचे दुष्परिणाम लक्षात घेतले पाहिजेत. ग्रीन टेक्नॉलॉजी संकल्पना - ''वृक्षवल्ली आम्हा सोयरी'' या अभंगानुसार ओसाड टेकडीवर सुद्धा हिरवाई निर्माण करून नंदनवन फुलवणे शक्य आहे. ''झाडे लावा झाडे जगवा'' हा मंत्र जपा. पारंपारिक उर्जा, सौरशक्ती वापर - उपलब्ध नैसर्गिक साधनांचा वापर, जलव्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण संवर्धन याबाबत सकारात्मक विचार केला पाहिजे. प्रत्येकानेच पर्यावरण संतुलन 'माझे राष्ट्रीय कर्तव्य आहे' याची जाण ठेवली तर जनजागृतीतून हिरवाई-शुद्ध हवा, शुद्ध पाणी-स्वच्छ जीवन-पर्यावरण साक्षरता निर्माण होईल. भय चिंता नष्ट होईल - मानव जीवन विकसित समृद्ध बनेल.

- **अशोक शिवराम कुलकर्णी,** कोल्हापूर

## वास्तुदेवीस

वंदन तुज वास्तुदेवी हे अखेरचे
दर्शन नच इथुन पुढे तुझे व्हायचे
वावरलो आम्ही इथे संगती सदा
दमुनी तव अंकावर पहुडलो तुझ्या
दारे अन् खिडक्यासह चार भिंती त्या
रंगवुनी सुबकपणे नित्य सजविल्या
फरशीचे अंग तुझे रोज पुसुनिया
आरशासम चकचकीत ठेविले सदा
अंगणात घाण धूळ ना पडू दिली
संमार्जन रांगोळी पुढती रेखिली
फुलझाडे हौसेने भवती जगविली
तुळशीला वृंदावनी दारी बसविली
कुंदाचा वेल तुझ्या देही चढविला
भवताली सोबतीस दिले मेंदिला
प्रेमाने तव पूजा नित्य बांधिली
वास्तुदेवी तू छाया आम्हाला दिली
पर हाती सोपविता हृदय तुटतसे
पूजा ही शेवटास अज जातसे
अमुचा येथील शेर आज संपला
लेकुरे तुझीच देवी लांबती तुला

**- आर.जी.कडवेकर,** सातारा
दूरध्वनी - २५१५७६

## बुधवार कट्टा

नम्र विनवितो, सत्य सांगतो, करू नका थट्टा
असा हा बुधवारचा कट्टा
आज आठवडी बुधवार नेमी नित्य येई लौकर
असे कट्ट्यावरती निवृत्तांची हजेरी मोठीच फार
हजेरी मोठीच फार असा हा बुधवारचा कट्टा ॥१॥
आज विषय असे चर्चेचा, जिव्हाळ्याचा पेन्शनवाढीचा
आहे दीर्घ कोर्टकचेरीचा, सूर दिसतोय नाराजीचा
सूर दिसतोय नाराजीचा, असा हा बुधवारचा कट्टा ॥२॥
एक अर्ध्या टक्क्यासाठी गवसली एक सोसायटी
धन परत मिळविण्यासाठी जीव आला मेटाकुटी
जीव आला मेटाकुटी, असा हा बुधवारचा कट्टा ॥३॥
होई नेत्यांची धडपड, यत्न करिती जिवापाड
समस्यांची करिती चिरफाड, शेवट नक्कीच होईल गोड
शेवट नक्कीच होईल गोड, असा हा बुधवारचा कट्टा ॥४॥
अनुभवांची मोठ्ठी शिदोरी, का कशास हवी उधारी ?
मनी ठेवा नित्य उभारी, भेटुया पुन्हा बुधवारी
भेटुया पुन्हा बुधवारी, असा हा बुधवारचा कट्टा ॥५॥
नम्र विनवितो सत्य सांगतो करू नका थट्टा
असा हा बुधवारचा कट्टा ॥

**- प्रभाकर कानिटकर**
कोल्हापूर, भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## Think Over This

To be good is noble, but to show others
to be good is nobler and no trouble.
If you pich up a starving dog and make
him properous, he will not bite you
This is the principle difference between
a dog and a man.
The service we render to others is solely
the rent we pay for our room on this earth.

*Collection by -**A.D. Rotkar,***
*Wardha, Tel.254175*

## नवीन म्हणी

१) अंथरुण वाढवून पाय पसरावे.
२) चुकला आमदार घोडे बाजारात.
३) अडली जनता मंत्र्याचे पाय धरी.
४) चुकला मंत्री जंगलात (शिकारीला).
५) हरिण जाते जिवानीशी सलमान म्हणतो वातड.
६) खुर्ची मिळो जनता मरो.
७) मंत्र्यापेक्षा लाच भारी.
८) जित्याची खोड भ्रष्टाचाराशिवाय जात नाही.
९) भ्रष्टाचाराशिवाय मंत्रीपद नाही.
१०) खुर्ची सलामत तर पैसा अफाट.
११) मंत्र्यापेक्षा अधिकारी भारी.

**- अशोक बुटाला,** मुंबई

## व्यक्तिविशेष

## साहित्य-सेवक-अरुण डावखरे

सर्वसामान्य मनुष्याला आपल्या जीवनात रोजी-रोटीसाठी काहीतरी व्यवसाय वा नोकरी करणे आवश्यक असते. परंतु असे काही करीत असताना प्रत्येकाला काहीतरी वैयक्तिक आवड वा छंद असतो, पण त्याला योग्य ते वळण लावले वा त्यात प्रावीण्य संपादन केले तर स्वत:चे जीवन जगण्याचा आनंद द्विगुणित होत असतो व इतरांनाही आनंद दिला जातो.

आपले संगमनेर येथील एक सभासद श्री.अरुण डावखरे हे फेब्रु.२००७ मध्ये सेवानिवृत्त झाले. वाचन - लेखनाची आवड त्यांना आधीपासूनच होती, पण ती त्यांनी योग्य रीतीने वाढवत नेली. १९७८ पासून त्यांच्या मराठीतील विनोदी, सामाजिक आणि अनुवादित अशा कथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अशा किर्लोस्कर, वसुधा, विशाखा, राजस, बुवा इ. मासिकांतून व दिवाळी अंकातून प्रसिद्ध होऊ लागल्या.

त्यांच्या लेखनाचा आवाका तसा खूप मोठा आहे व त्यात वाढ होतच आहे. आत्तापर्यंत मराठीत त्यांचे १) एक वाडा उरलेला २) हातचं सोडून ३) टेक इट लाईटली असे तीन कथासंग्रह, १ कादंबरी प्रसिद्ध झाली आहे.

मराठीशिवाय इंग्रजी भाषेवर देखील त्यांचे प्रभुत्व असल्याने, त्यांनी इंग्रजी कथा, कादंबऱ्या व चित्रपट कथा यांचे मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांना त्या साहित्याची ओळख करून देण्याचा स्तुत्य उपक्रम केलेला आहे. आत्तापर्यंत अशा अनुवादित साहित्यात त्यांनी ४ कादंबऱ्या, ४ चित्रपट कथा इ. कथा संग्रह यांची भर झातली आहे. त्याच्या ११ अनुवादित कादंबऱ्या प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, या ख्यातनाम संस्थेचे ते सन्माननीय सभासद आहेत.

लेखन वाचन ह्या शिवाय त्यांना ट्रेकिंगची ही अत्यंत आवड आहे. त्यांच्या साहित्य सेवेला ''संवाद'' तर्फे हार्दिक शुभेच्छा !

- शब्दांकन, वसंत धुपकर

## प्रतिक्रिया

माझी पत्नी सौ.सुजाता देशपांडे हिच्या ३१/३/२००१ च्या 'स्वेच्छा निवृत्ती' पासून 'संवाद' नियमित वाचत असतो.

जाहिराती व छायाचित्रांअभावी रूक्ष दिसूनही 'संवाद' खूप वाचनीय असतो. त्याबद्दल अभिनंदन !

**- विजय देशपांडे,** दादर, मुंबई २८

******

आपले संवाद दि.२९ जुलै रोजी मिळाले. त्याआधी श्री.सहस्रबुद्धे यांनी मला कळविले की आपले हिंदी संस्करण 'नया जमाना' चा समीक्षा लेख श्री.चित्रे यांनी लिहिलेला आहे. वाचून फारच आनंद झाला. मला अनुभव आला की संपादक सभासदांशी घरातील व्यक्तीप्रमाणे किती जवळीक साधतात व त्यांच्या लेखनाची किती कदर करतात. मला हा प्रथम अनुभव आल्यामुळे 'संवाद' शी माझी फारच जवळीक वाढली. म्हणूनच या वयात 'संवाद'चा आम्हाला आधार वाटतो.

**- ए.पी.बागूल,** धुळे

******

'संवाद' मासिकाचा अंक नियमित व वेळेवर मिळतात. त्यातील लेख खूप छान असतात. जीवनामध्ये सकारात्मकरित्या विचार करायला उद्युक्त करतात. जुलैच्या अंकातले सर्व बक्षिसपात्र लेख विचार करायला लावणारे होते. ह्याचप्रमाणे समाजासाठी आपणही अल्पस्वल्प सेवा करावी अशी स्फूर्ती देणारे होते. प्रत्येक अंकातील संपादकीय चालू घडामोडींचा आढावा घेणारे व विचारांना चांगली दिशा देणारे वाटले. सभासदांनी पेन्शन घेतल्यावर कसे वागावे आतापर्यंत घाईच्या जीवनात जे इच्छा असूनही करू शकलो नाही ते आता करावे व आनंद घ्यावा याविषयीची कविता खूप आवडली.

**- श्री.ज.द.पाठक,**

**-सौ.रजनी पाठक,** जळगाव



### शंका

मृत्युशय्येवरील पती पत्नीला म्हणतो, ''मी आता जास्त घटकांचा सोबती नाही. पण माझ्या मनात एक शंका आहे. तिचं खरंखुरं उत्तर दिलेस तर मी सुखाने मरेन.''

पत्नी - ''कसली शंका ?''

पती - ''आपले पहिले तीन मुलगे गोरे, हुशार आहेत. पण हा चौथा मुलगा काळा आणि विद्रूप कसा ? तो माझाच मुलगा आहे ना ? सांग बरं.''

पत्नी - ''प्रश्नच नाही. तो तुमचाच मुलगा आहे.''

(मनात म्हणते - नशीब ! पहिले तीन मुलगे कुणाचे ते विचारले नाही !)

**- पी.के.देवधर,** पुणे

### कोण कुणाचा कोण ?



''आईऽऽ मी बाहेर जाऊन येतो हं !''

''हं ! ठीक. पण कुठे ?''

''डेव्हीडच्या भावांकडे''

''हा डेव्हीड कोण काढलास आता ? अन् त्याच्या भावाकडे जातो म्हणतोस. त्याला काही नाव गाव आहे का नाही ? जेव्हा जेव्हा विचारते तेव्हा तेव्हा तुझं एकच. डेव्हीडच्या भावाकडे जातो म्हणून !''

''त्याचं नाव जॉन. मला माहीत होतं की मी जॉनकडे जातो म्हटलं तर तू विचारणार, हा जॉन कोण ?''

''जॉन म्हणजे डेव्हीडचा भाऊ ! कळलं ?''

''आता डेव्हीड कोण हा म्हणून नको विचारू. डेव्हीड म्हणजे जॉनचा भाऊ.''

**- मधु रानडे,** नाशिक


September 2009 SAMVAD
State Bank of India
With you - all the way
Pure Banking. Nothing else.
8%
Breaking the interest rate barrier!
If you've been waiting for car loan interest rates to get lower, your wait is over.
India's Largest Bank brings you SBI EZEE Car Loan, with unbeatable interest rates*.
• Just 8% fixed for the first year
• 10% fixed for the 2nd and 3rd years
• 4th year onwards, interest is applicable as per card rate on the date of sanction on floating rate basis (currently 11.25% to 11.50%) based on the tenure
NO PROCESSING FEES!
SBI CAR LOAN
WALK IN. DRIVE OUT
*Conditions Apply
For more information, please call 1800-112211 (toll free from BSNL / MTNL landlines) or 080-26599990 (from other lines). Email: contactcentre@sbi.co.in or visit our nearest branch / www.sbi.co.in
THE BANKER TO EVERY INDIAN
15

September 2009 SAMVAD

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008**
**License to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month**



Shri V. M. Gokhale, President, speaking at Annual General Meeting Dt. 22nd July 2009 at Ahmednagar.



Shri B. G. Dandekar, Advisor to the Federation speaking at Annual General Meeting Dt. 22nd July 2009 at Ahmednagar.

सुचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.

२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.